


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २६४ ●मंगळवार,दि.२३ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी ! 9 दिवसात लागू होणार 8 वा वेतन आयोग ?

- ७व्या वेतन आयोगाचा कालावधी ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपणार
- १ जानेवारी २०२६ पासून ८वा वेतन आयोग लागू होण्याची शक्यता
- वेतन, भत्ते आणि पेन्शनमध्ये मोठी वाढ अपेक्षित
- केंद्र सरकारी कर्मचारी, पेन्शनधारकांसाठी आनंदाची बातमी आहे

**नवी दिल्ली**

३१ डिसेंबर २०२५ रोजी ७ व्या वेतन आयोगाचा कालावधी औपचारिकपणे संपत आहे. यामुळे आठव्या वेतन आयोगाबद्दल अपेक्षा वाढत आहेत. केंद्र सरकारने ऑक्टोबर २०२५ मध्ये आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना मान्यता दिली आहे. दरम्यान आयोगाला वेतन, भत्ते आणि पेन्शनबाबतच्या शिफारसी सरकारला सादर करण्यासाठी सुमारे नोव्हेंबर २०२५ पासून सुमारे १८ महिन्याचा कालवधी देण्यात आलाय.

सरकारी कारभाराची परंपरा आपण पहिली तर वर्षाच्या सुरुवातीपासून नवीन वेतन प्रणाली लागू केली जाते. त्यामुळे १ जानेवारी २०२६ पासून नवीन वेतन प्रणाली लागू केली जाईल, असा अंदाज आहे. परंतु त्यादिवसापासून कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होणार नाहीये. तज्ज्ञांच्या मतानुसार, वेतन आयोग लागू होणे आणि वाढवून पगार मिळण्याच्या वेळेत मोठा




फरक असतो. सातव्या वेतन आयोगादरम्यानही अशीच परिस्थिती उद्भवली होती. जानेवारी २०१६ पासून हा पगार लागू करण्याचा विचार करण्यात आला होता, परंतु जूनमध्ये मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली. त्यानंतरच नवीन पगार आणि थकबाकी मिळण्यास सुरुवात झालीय.आठव्या वेतन आयोगाअंतर्गत पगार किती वाढू शकतो, असा प्रश्न अनेकांना पडलाय. अद्याप कोणतेही अधिकृत आकडे नाहीत, परंतु मागील आयोगांच्या आधारे अंदाज लावले जात आहेत. सहाव्या वेतन आयोगाने सरासरी ४०टक्के वाढ दिली तर ७व्या वेतन आयोगाने सुमारे २३-२५टक्के वाढ दिली. यात फिटमेंट फॅक्टर २.५७ होता. आठव्या वेतन आयोगाच्या सुरुवातीच्या अंदाजानुसार २० टक्के ते ३५टक्के वाढ होण्याची शक्यता आहे.

## परळी शहरात दोन पराभूत उमेदवारांच्या समर्थकांत दगडफेक; दोन जण जखमी

**परळी । प्रतिनिधी**

परळी येथे नगरपालिका नगराध्यक्ष व नगरसेवक पदाचे मतदान, मतमोजणी शांततेत पार पडली. मात्र शहरातील इस्लामपुरा बंगला परिसरात नगरसेवक पदाच्या दोन पराभूत उमेदवारांच्या समर्थकांमध्ये रविवारी रात्री वादावादी होऊन ८.३० वाजता रुपांतर दगडफेकीत झाले. या घटनेत दोघेजण जखमी



झाले आहेत. परळी शहरात सकाळ पासून नगर पालिका निवडणूकीची शांततेत मतमोजणी झाली. त्यांनतर रात्री आठ वाजेपर्यंत आप

**● उपजिल्हा रुग्णालयात रात्री दहापर्यंत गर्दी**

**उपजिल्हा रुग्णालयातील अपघात विभागाच्या बाहेर जखमींना भेटण्यासाठी त्यांच्या मित्र व नातेवाईकांची एकच गर्दी दिसून आली. ही गर्दी रात्री साडेदहा वाजेपर्यंत होती. मात्र पोलिसांच्या तत्काळ हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळला. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणी रात्री साडेदहा वाजेपर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. या प्रकरणी तक्रार आल्यांनतर गुन्हा नोंदवण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले.**

आपल्या प्रभागात विजयी झालेले नगरसेवक, ▶ उर्वरित पान २ वर

## राज्यातील तीन आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या;. ठाणेकन्या डॉ.कश्मीरा संखेंना नाशिकमध्ये खास जबाबदारी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील नगरपालिका निवडणुकांचे निकाल हाती आले असून आता महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्यातच, राज्यातील तीन सनदी अधिकाऱ्यांच्या (IAS) बदल्या करण्यात आल्या असून ठाणे जिल्ह्याची कन्या असलेल्या डॉ. कश्मीरा संखे यांचीही बदली करण्यात आली आहे. कश्मीरा संखे यांच्याकडे आता नाशिक जिल्ह्यातील आयटीडीपी या प्रकल्पावर सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. संखे यांच्यासह वरिष्ठ




सनदी अधिकारी शैला ए. (आयएएस: आरआर: २००३) सचिव (वित्तीय सुधारणा, वित्त मंत्रालय) यांना मंत्रालयातील नियोजन विभागाच्या सचिव आणि विकास आयुक्तपदी नियुक्त करण्यात आली आहे. यांसह २०२३ च्या बॅचचे आएएएस अधिकारी अरुण एम यांना गडचिरोलीत सहाय्यक जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच राज्यातील ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी करण्यात आले होते. १८ नोव्हेंबर रोजी प्राप्त बदली आदेशानुसार त्रिगुण कुलकर्णी यांची इयत्ता १० वी आणि १२ वी शिक्षण बोर्डाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. त्रिगुण कुलकर्णी हे सध्या पुण्यातील सनदी अधिकाऱ्यांसाठीची प्रशिक्षण संस्था असलेल्या यशदा येथे उपमहासंचालक ▶ उर्वरित पान २ वर

## उत्पादकता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

शेतीची उत्पादकता आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविण्याचे राज्य सरकारने ठरविले असून, येत्या २ वर्षात २५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेती लागवडीखाली येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एल.आय.टी.) माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजित उडान संमेलनात ते बोलत होते. सत्यनारायण नूवाल आणि पद्मश्री डॉ. डी. के. यादव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. आर. एल. सोनोलिकर, अरुण दांडेकर यांना जीवन गौरव प्रदान करण्यात आला. तसेच लाइफ टाइम अचिव्हमेंट दीपक लव्हाळा



यांना, ज्वेल ऑफ एलआयटी डॉ. सुगंधा गारवे, कीर्ती गणोरकर, आर.जी. कृष्णन, अमित सिन्हा, नीरा चंदना यांना, तर युथ आयकॉन ▶ उर्वरित पान २ वर

## EVM वर आधी राष्ट्रीय पक्षाचे उमेदवार, नंतर प्रादेशिक पक्ष अन् शेवटी अपक्ष; जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांच्या नियमात मोठा बदल

**मुंबई । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठीच्या नियमांमध्ये राज्याच्या ग्रामविकास खात्याने एक महत्त्वपूर्ण बदल केला आहे. यापुढे ईव्हीएम बॅलेट मशीन यावर पहिला राष्ट्रीय पक्ष, त्यानंतर प्रादेशिक पक्ष मग अपक्ष उमेदवार असा क्रम असणार आहे. या क्रमानेच उमेदवारांची यादीही प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ग्रामविकास खात्याने त्यासंबंधी




एक जीआर प्रसिद्ध केला आहे.

या आधी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत आडनावाच्या अद्याक्षरानुसार क्रमवार नावे असायची. त्यामुळे राष्ट्रीय पक्षाच्या आणि राज्य प्रादेशिक पक्षाच्या उमेदवारांची नावे खाली जायची. आता नव्या गॅझेटनुसार, राष्ट्रीय पक्षाच्या आणि प्रादेशिक पक्षाच्या उमेदवारांची नावे सर्वात वर असतील.

महाराष्ट्र शासनाने पंचायत समिती निवडणूक नियम मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करत निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि शिस्त आणण्याचा प्रयत्न केला आहे. १५ डिसेंबर २०२५ रोजी ग्रामीण विकास विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची पद्धत पूर्णपणे बदलण्यात आली आहे. हे नियम तातडीने लागू करण्यात आल्याने आगामी पंचायत समिती निवडणुकांवर त्याचा थेट परिणाम होणार आहे. नियमात नेमका बदल काय झाला? आतापर्यंत पंचायत समिती निवडणुकांमध्ये उमेदवारांची ▶ उर्वरित पान २ वर

## स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांसाठी अर्ज पाठविण्याचे आवाहन

**नवी दिल्ली**

मराठी भाषेतल्या साहित्य निर्मितीबद्दल राज्य शासनाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ साठी अर्ज मागविण्यात आले आहेत. १ जानेवारी ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तके या स्पर्धेसाठी पात्र आहेत. मुंबईच्या रवींद्र नाट्यमंदिरात ३० जानेवारी २०२६ पर्यंत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे पुस्तके पाठवावीत, असे आवाहन मंडळाच्या सचिवांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. मंडळाच्या कार्यालयात तसेच मुंबई शहर आणि मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता इतर ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात तर 'सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कारा'साठी महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली येथे प्रवेशिका पाठविता येणार असून प्रवेशिका विनामूल्य उपलब्ध आहेत. लेखक आणि प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका पाठवू शकतात. 'सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार' हा खास बृहन्महाराष्ट्रातील उत्कृष्ट साहित्य ▶ उर्वरित पान २ वर












# गोंधळाच्या गदारोळात हरवलेला 'संवाद' आणि 'जावेद अख्तर अन् मुफ्ती शमाईल'ची शिकवण

रोज रात्री टीव्हीच्या 'प्राइम टाइम'ला जे काही घडते, त्याला 'चर्चा' (Debate) म्हणणे हाच मुळात 'चर्चा' या शब्दाचा अपमान ठरेल. स्क्रीनवर आठ-दहा खिडक्या, प्रत्येकाच्या अंगात संचारलेला आवेष, अँकरचा वाढलेला रक्तदाब आणि मुद्द्यांना सोडून होणारी वैयक्तिक चिखलफेक... हे दृश्य आता भारतीय घराघरांमध्ये नित्याचे झाले आहे. कुत्र्या-मांजरांच्या भांडणाप्रमाणे एकमेकांवर गुरगुरणारे पॅनलिस्ट पाहून, यातून समाजाला काय मिळणार? हा प्रश्न सुज्ञ प्रेक्षकाला पडल्याशिवाय राहत नाही. पण, या कोलाहलाच्या वाळवंटात



नुकतीच एक सुखद वाऱ्याची झुळूक अनुभवायला मिळाली, ती म्हणजे ज्येष्ठ गीतकार जावेद अख्तर आणि इस्लामिक अभ्यासक मुफ्ती शमाईल नदवी यांच्यातील संवादाच्या रूपाने.

'ईश्वराचे अस्तित्व आहे की नाही?' हा तसा अत्यंत स्फोटक विषय. एका बाजूला स्वतःला नास्तिक म्हणवणारे आणि विज्ञानाची कास धरणारे जावेद अख्तर, तर दुसऱ्या बाजूला कुराण आणि हदीसचा अभ्यास असलेले मुफ्ती शमाईल. टीव्ही चॅनेलच्या भाषेत सांगायचे तर, हा 'टीआरपी'चा महासंग्राम होता. तिथे ठिणग्या पडायला हव्या होत्या, आरडाओरडा व्हायला हवा होता. पण घडले ते मात्र पूर्णपणे वेगळे आणि आश्वासक. या चर्चेने (किंवा संवादाने) समाजाला हे दाखवून दिले की, दोन टोकाची मते असणारी माणसेही एका टेबलावर बसून सभ्यपणे बोलू शकतात. जावेद अख्तर यांनी त्यांचे नेहमीचे धारदार प्रश्न विचारले, पण त्यात समोरच्याला अपमानित करण्याचा हेतू नव्हता, तर सत्य जाणून घेण्याची जिज्ञासा होती. दुसरीकडे, मुफ्ती शमाईल यांनीही अत्यंत शांतपणे, तर्काच्या आधारे आपली बाजू मांडली. जेव्हा जावेदजी बोलत होते, तेव्हा मुफ्ती साहेब शांतपणे ऐकत होते आणि जेव्हा मुफ्ती साहेब बोलत होते, तेव्हा जावेदजी मान डोलावत त्यांचे म्हणणे समजून घेत होते. आजच्या युगात दुर्मिळ झालेली 'ऐकून घेण्याची कला' (Art of Listening) या दोघांनी पुन्हा जिवंत केली.

आजकालच्या टीव्ही डिबेट्समध्ये 'जिंकणे' महत्त्वाचे असते. समोरच्याला गप्प केले की आपण जिंकलो, असा तिथे अघोषित नियम असतो. पण या सोज्वळ चर्चेने हे सिद्ध केले की, चर्चेचा उद्देश जिंकणे नसून 'जाणून घेणे' (Understanding) असावा लागतो. मतभेद असणे म्हणजे शत्रुत्व असणे नव्हे, हे सूत्र या दोन्ही विद्वानांनी आपल्या वागण्यातून अधोरेखित केले.

भारतीय संस्कृती ही मुळातच 'शास्त्रार्था'ची संस्कृती आहे. इथे आदि शंकराचार्य आणि मंडन मिश्र यांच्यात वादविवाद झाले, पण ते ज्ञानाच्या पातळीवर होते, आवाजाच्या पातळीवर नाही. दुर्दैवाने, टीव्ही चॅनेल्सनी या परंपरेचे रूपांतर 'गोंधळात' केले आहे. अशा वेळी जावेद अख्तर आणि मुफ्ती शमाईल यांची ही चर्चा, माध्यमांसाठी आणि प्रेक्षकांसाठी एक 'केस स्टडी' आहे.गोंधळ, आरडाओरड आणि द्वेष पसरवून काही काळ प्रेक्षक मिळवता येतीलही, पण समाजाची वैचारिक भूक भागवण्यासाठी अशाच सोज्वळ आणि अभ्यासू संवादांची गरज असते. हा संवाद फक्त दोन व्यक्तींमधला नव्हता, तर तो हरवत चाललेल्या सहिष्णुतेचा आणि बौद्धिक श्रीमंतीचा आरसा होता.

टीव्ही चॅनेल्सनी आता ठरवायचे आहे-त्यांना प्रेक्षकांना 'कोंबड्यांची झुंज' दाखवायची आहे, की विचारांचे अमृत द्यायचे आहे? कारण प्रेक्षकांनी या शांततापूर्ण चर्चेला दिलेला उदंड प्रतिसाद हेच सांगतो की, लोकांना अजूनही दर्जेदार आणि सभ्य काहीतरी बघायचे आहे.

**– शबनम मुजीब खान**
**छत्रपती संभाजीनगर**
**(औरंगाबाद)**

## 'राष्ट्रीय शेतकरी दिवस'



भारतात दरवर्षी २३ डिसेंबर हा दिवस 'राष्ट्रीय शेतकरी दिवस' किंवा 'किसान दिवस' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भारताचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरण सिंह यांची जयंती आणि त्यांनी शेतकरी कल्याणासाठी केलेले कार्य यांच्या स्मरणार्थ हा दिवस समर्पित आहे.

बळीराजाचा सन्मान: राष्ट्रीय शेतकरी दिवस

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे, हे केवळ वाक्य नसून ते एक सत्य आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांचे स्थान अत्यंत मोलाचे आहे. आपल्या ताटात येणाऱ्या अन्नाच्या प्रत्येक कणामागे एका शेतकऱ्याचे अतोनात कष्ट, घाम आणि संयम असतो.

हा दिवस का साजरा केला जातो?

हा दिवस भारताचे माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह यांच्या जन्मदिनी साजरा होतो. त्यांनी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि ग्रामीण विकासासाठी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले होते. शेतकऱ्यांच्या समस्यांना संसदेत वाचा फोडणारे ते एक खंबीर नेते होते. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून २००१ पासून हा दिवस राष्ट्रीय स्तरावर साजरा होऊ लागला.

शेतकऱ्यांचे योगदान

✻ अर्थव्यवस्थेचा कणा: भारताची अर्थव्यवस्था आजही मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून आहे.

✻ अन्न सुरक्षा: देशातील कोट्यवधी जनतेचे पोट भरण्याची जबाबदारी शेतकरी पूर्ण निष्ठेने पार पाडतो.

✻ कठोर परिश्रम: कडाक्याची थंडी असो, रणरणते ऊन असो किंवा मुसळधार पाऊस, शेतकरी कधीही डगमगत नाही.

आजची गरज- आजच्या आधुनिक काळात तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक नफ्याची करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळणे आणि त्यांना कर्जबाजारीपणातून मुक्त करणे ही काळाची गरज आहे. आपण केवळ २३ डिसेंबरलाच नव्हे, तर वर्षभर शेतकऱ्यांच्या कष्टाचा आदर केला पाहिजे.

जय जवान, जय किसान!

◆ पान ९ वरून पुढे...

### परळी शहरात...

समर्थक आनंद साजरा करत असतांना इस्मामपुरा भागात मात्र दोन पराभूत नगरसेवकाच्या गटात दगडफेकीची घटना घडली. या घटनेतील जखमींना परळी उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, एका जखमीस पुढील उपचारासाठी रुग्णवाहिकेतून अंबाजोगाई येथील स्वाराती आले जखमी रुग्णालयात हलविण्यात आहे. झालेल्या प्रकृती सध्या स्थिर दोघांची आहे. पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन, पोलीस उपनिरीक्षक दीपक राठोड, पोलीस जमादार संजय खताळ, आकाश जाधव यांच्यासह बीड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

### राज्यातील तीन...

पदावर कार्यरत होते. तसेच, राहुल रंजन महिवाल, प्रकाश खपले, डॉ. मंजिरी मानोलकर, अंजली रमेश या चार IAS अधिकाऱ्यांचीही बदली करण्यात आली होती. आता, आज २२ डिसेंबर रोजी तीन आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

तीन अधिकाऱ्यांच्या बदल्या कुठे, कुठल्या पदावर?- डॉ. कश्मीरा संखे (आयएएस: आरआर:२०२३) सहाय्यक जिल्हाधिकारी, तुमसर उपविभाग, भंडारा यांना नाशिक जिल्ह्यातील आयटीडीपी, कळवानंद येथे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी पदावर जबाबदारी देण्यात आली आहे. कळवान उपविभाग येथे त्यांची नियुक्ती असणार आहे. तर, अरुण एम. (आयएएस: आरआर: २०२३) सहाय्यक जिल्हाधिकारी, चार्मोशी उपविभाग गडचिरोली यांनाही गडचिरोली आणि सहाय्यक जिल्हाधिकारी तथा आयटीडीपी, प्रकल्प अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. गडचिरोली उपविभाग येथे त्यांची नियुक्ती असणार आहे. यासह, वरिष्ठ सनदी अधिकारी शैला ए. (आयएएस: आरआर: २००३) सचिव (वित्तीय सुधारणा, वित्त मंत्रालय) यांना मंत्रालयातील नियोजन विभागाच्या सचिव आणि विकास आयुक्तपदी नियुक्त करण्यात आली आहे.

### उत्पादकता वाढविण्यासाठी...

पुरस्कार चिंतन शाह यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. आज सर्वच क्षेत्रात एआयचा वापर होतो आहे. ती काळाची गरज आहे, त्यामुळे एल आय टी सारख्या संस्थानी मोठ्या प्रमाणात एआयचा स्वीकार करावा, असे आवाहन करुन मुख्यमंत्री म्हणाले की, हे झाले तर जागतिक स्तरावरील स्पर्धेसाठी आपण विद्यार्थी घडवू शकू. फक्त अभ्यासक्रमांनी शिक्षण संस्था

◆ पान ९ वरून पुढे...

मोठी होत नाही, तर ती मोठी होते ती तिच्या विद्यार्थ्यांमुळे, असे पद्मश्री डॉ. यादव यावेळी म्हणाले. दृढ संकल्प असेल तर कोणत्याही क्षेत्रात यश मिळू शकते, असे सत्यनारायण नूवाल यांनी सांगितले. रावबहादूर डी. लक्ष्मी नारायण यांना लक्ष्मीनारायण गीताद्वारे अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक एलआयटी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष माधव लाभे यांनी केले. मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्वागत माधव लाभे यांनी केले. सत्यनारायण नूवाल यांचे स्वागत कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांनी, तर पद्मश्री डॉ. यादव यांचे स्वागत मोहन पांडे यांनी केले. संघटनेच्या स्मरणिकेचे प्रकाशन अतिथींच्या हस्ते झाले. राकेश गुप्ता, उत्कर्ष खोपकर, मोहन पांडे यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सचिन पळसोडकर आणि मिली जुनेजा यांनी केले. आभार डॉ. वैद्य यांनी मानले.

### EVM वर आधी....

यादी कशी मांडायची याबाबत स्पष्ट आणि एकसंध पद्धत नव्हती. नव्या सुधारणेनुसार, निवडणूक चिन्ह वाटपानंतर उमेदवारांची यादी ठरावीक चार गटांमध्ये विभागून प्रसिद्ध करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे मतदारांना उमेदवारांची माहिती अधिक सोप्या आणि स्पष्ट स्वरूपात मिळणार आहे.

उमेदवारांचे चार गट निश्चित- नव्या नियमांनुसार उमेदवारांची यादी पुढील चार प्रवर्गांमध्ये विभागली जाईल- मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि महाराष्ट्रातील राज्यस्तरीय पक्षांचे उमेदवार, इतर राज्यांतील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षांचे उमेदवार, राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पण अमान्यताप्राप्त पक्षांचे उमेदवार, अपक्ष उमेदवार

या वर्गीकरणामुळे मोठ्या पक्षांपासून अपक्ष उमेदवारांपर्यंत सर्वांची स्पष्ट वेगळी ओळख निर्माण होणार आहे.

मराठी वर्णानुक्रमाचा नियम का महत्त्वाचा? प्रत्येक प्रवर्गातील उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमानुसार लावण्याचा निर्णय हा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. उमेदवारांचे आडनाव, त्यानंतर नाव आणि पत्ता या क्रमाने माहिती दिली जाणार आहे. यामुळे नावाच्या क्रमावरून होणारे संभाव्य संभ्रम, तक्रारी आणि वाद टाळता येण्याची शक्यता आहे.

नमुना क्रमांक ३ मध्ये बदल म्हणजे काय? राजपत्रातील अधिसूचनेनुसार नमुना क्रमांक ३ पूर्णपणे बदलण्यात आला आहे. नव्या नमुन्यात- प्रवर्ग, अनुक्रमांक, उमेदवाराचे नाव, पत्ता, निवडणूक चिन्ह- ही सर्व माहिती एकाच तक्त्यात देणे बंधनकारक आहे. विशेष म्हणजे सर्व प्रवर्गांसाठी अनुक्रमांक सलग ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, स्वतंत्र क्रमांक देण्यास मनाई आहे. राजकीय पक्षांसाठी याचा अर्थ काय? या बदलाचा

◆ पान ९ वरून पुढे...

सर्वाधिक परिणाम लहान आणि अमान्यताप्राप्त पक्षांवर होण्याची शक्यता आहे. मान्यताप्राप्त पक्षांचे उमेदवार यादीत वरच्या गटात राहणार असल्याने त्यांना दृश्यमानतेचा फायदा मिळू शकतो. मात्र अपक्ष आणि लहान पक्षांसाठी स्वतंत्र ओळख अधिक स्पष्ट होणार असल्याचा दावा शासनाकडून केला जात आहे. आगामी निवडणुकांवर परिणाम काय? आगामी पंचायत समिती निवडणुकांमध्ये हे सुधारित नियम लागू राहणार असल्याने उमेदवार यादीबाबत वाद कमी होण्याची शक्यता. निवडणूक प्रक्रिया अधिक शिस्तबद्ध होणार. मतदारांना माहिती सहज उपलब्ध होणार.

### स्व.यशवंतराव...

निर्मितीसाठी प्रदान करण्यात येणार आहे. या श्रेणीत उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी साहित्याच्या सर्व प्रकारातील साहित्यकृती या पुरस्कारासाठी पाठविता येणार असून उत्कृष्ट साहित्यकृतीस 'सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार' (पुरस्कार रक्कम १,००,००० रूपये) प्रदान करण्यात येणार आहे. बृहन्महाराष्ट्र क्षेत्रातील विजेत्यांसाठी 'सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार' (सर्व साहित्य प्रकार) साठी निवड केली जाईल. प्रवेशिका पूर्णत: भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात किंवा महाराष्ट्र परिचय केंद्र नवी दिल्ली यांच्याकडे ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात. लेखक / प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करु शकतात. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या सदरात 'स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाड्मय पुरस्कार नियमावली व प्रवेशिका' या शीर्षाखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या https://sahitya.marathi.gov.in/ या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियम पुस्तिका उपलब्ध आहे. यासह या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी रोड, प्रभा देवी, मुंबई-४०० ०२५ यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच, बृहन्महाराष्ट्रातील लेखक व प्रकाशकांसाठी महाराष्ट्र परिचय केंद्र, ए/८, स्टेट एम्पोरिया बिल्डींग, बाबा खडक सिंह मार्ग, नवी दिल्ली या कार्यालयातही स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका उपलब्ध आहे. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाड्मय पुरस्कार योजनेअंतर्गत एकूण चार विभागात ३५ साहित्य प्रकारांसाठी प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रौढ वाड्:मय विभागात एकूण २२ साहित्य प्रकार असून प्रत्येकी १ लाख रुपये या प्रमाणे एकूण २२ लाख रूपयांची पुरस्कारांची रक्कम आहे. बाल वाड्:मय विभागात एकूण सहा साहित्य प्रकारात प्रत्येकी ५० हजार रुपये याप्रमाणे एकूण ३ लाख रूपयांची पुरस्कार रक्कम आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### बीड जिल्ह्याच्या...

या माध्यमातून विकास साधता येईल, असे सांगून त्या म्हणाल्या की, बालविवाहाच्या समस्येवर लक्ष केंद्रित करताना त्याला प्राधान्य दिले तर बालविवाह करण्याचे प्रमाण कमी होईल. मुलींना शिक्षणात प्राधान्य देण्याबाबत प्रसिद्धी तसेच प्रत्यक्ष यांच्यात जाणीव जागृती गरजेची आहे. कार्यक्रमांतर्गत बचत गटांना केवळ मर्यादित भूमिकेत न ठेवता त्यांना उद्योग प्रशिक्षण आणि त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. या गटांना मुद्रा कर्ज योजनेतून अधिकाधिक व्यवसाय आणि उद्योग यासाठी प्रोत्साहित करण्यासोबतच प्रशिक्षित करण्याची गरज आहे. असे सुमन चंद्रा यावेळी म्हणाल्या. विकासाचा आढावा केवळ आकडेवारीवर न घेता प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या जीवनात त्याचा किती लाभ झाला आहे याचे चित्रण आगामी काळात मांडावे. अशा सूचना सुमन चंद्रा यांनी यावेळी दिल्या. शक्य तितक्या प्रमाणात आवास योजना तसेच प्रधानमंत्री सूर्यघर आणि शेतकऱ्यांसाठी च्या सुमन योजने अंतर्गत अधिकाधिक लाभ देण्याच्या दृष्टीने अभ्यास करा व माहिती सादर करा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले

### चिंचाळा ते...

परिस्थिती तालुक्यातील रस्त्यांची झालेली आहे. यामुळे खड्डे बुजवले तरी त्याला दर्जा असावा, या रस्त्याची गुणवत्ता नियंत्रक मार्फत चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. दोन तीन वर्षात जर रस्त्याला ठिगळे लावण्याची वेळ येत असेल तर किती दर्जेदार रस्त्यांची कामे झाली आहेत हे यावरून दिसून येत आहे. संबंधित विभागाचे अधिकारी बीड कार्यालयात आणि आष्टी कार्यालयात तेच आहेत. सदरील महाशय फोन घेत नसल्याने त्यांचे म्हणणे घेता आहे नाही. रस्त्याचे काम केले तरी त्याला दर्जा असणे आवश्यक आहे.

### पोखरी (घाट) ...

फाळके, अंकुश मुळीक, बाबासाहेब माने, रावण खिल्लारे, त्रिंबक खिल्लारे, सुखदेव मुळीक, किरण माने आदी शेतकरी उपस्थित होते.

### ज्यांनी सांभाळ....

व्यक्तीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करून स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची चक्रे फिरवली. एलसीबीने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे मृत व्यक्तीची ओळख

◆ पान ४ वरून पुढे...

स्वप्निल ऊर्फ चिंगू अशोक ओव्हाळ (३०, रा. रेणापूर, जि. लातूर) अशी पटवली. तपासादरम्यान पोलिसांना संशय आल्याने त्यांनी स्वप्निलचा नातेवाईक गोरोबा मधुकर डावरे याला ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी केली असता, खुनाचे धक्कादायक कारण समोर आले.

खुनाचे कारण: सततचा त्रास आणि दारूचे व्यसन- स्वप्निल हा मुख्य आरोपी गोरोबा डावरे याच्या साडूचा मुलगा होता. साडू आणि साळपिण्याचे निधन झाल्यामुळे गोरोबाच स्वप्निलचा पालक म्हणून सांभाळ करत होता. स्वप्निलचे लग्नही गोरोबानेच लावून दिले होते. मात्र, स्वप्निलला दारूचे व्यसन होते. तो दारू पिऊन पत्नीला आणि गोरोबाला सतत त्रास द्यायचा. एकदा तर त्याने गोरोबाच्या अंगावर धावून जाण्याचा प्रकार केला होता. याच रागातून गोरोबाने स्वप्निलचा काटा काढण्याचे ठरवले.

असा रचला कट- गोरोबाने लातूर आणि नांदेड येथील तीन साथीदारांच्या मदतीने स्वप्निलला रेणापूरहून जवळगाव येथे आणले. तिथे त्याला बेदम मारहाण करून गळा आवळून त्याची हत्या केली आणि मृतदेह शेतात फेकून दिला. या प्रकरणात पोलिसांनी गोरोबा मधुकर डावरे (वय ४५, रा. जवळगाव, ता. अंबाजोगाई), संतोष लिंबाजी मांदळे (वय ३४, रा. लातूर), किशोर गोरोबा सोनवणे (वय २९, रा. लातूर), अमोल विनायक चव्हाण (वय २६, रा. नांदेड) या आरोपींना अटक केली आहे.

या पथकाने केली कामगिरी- ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि ज्ञानेश्वर कांबळे, पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारुती कांबळे, रामचंद्र केकान, विष्णू सानप, गोविंद भताने पोलीस अंमलदार सचिन आंढळे, विकी सुरवसे, चालक अतुल हराळे यांनी केली.

### कळंब - लातूर...

नातेवाईकांनी रुग्णालयात धाव घेतली. आपल्या आप्तस्वकीयांची अवस्था पाहून रुग्णालयात आक्रोश झाला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पसार झालेल्या चालकाचा शोध सुरू केला असून, महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे.

### राज्यस्तरीय गंगाई...

आष्टी तालुक्यातील हाजीपुर येथील अतिशय सामान्य कुटुंबातून शिक्षण घेऊन आपल्या ज्ञानार्जनाच्या कार्यातून मागील ३२ वर्षांमध्ये अनेक विद्यार्थी घडवले डॉक्टर,वकील,इंजिनियर, राजकीय,सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रात

◆ पान ४ वरून पुढे...

त्यांचे हजारो विद्यार्थी नावलौकिक असून त्यांच्या दिलेल्या ज्ञानार्जनामुळे तरुण पिढी घडली आहे. अनेकांचे आयुष्य घडवणारे आदर्श शिक्षक तालुक्यात आप्पा या नावाने परिचित आहेत. मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांच्याकडे विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत असून अभ्यासाची ही त्यांना गोडी लागत आहे.त्यांनी केलेल्या कार्यामुळे अनेक पुरस्काराने ते सन्मानित झाले आहेत. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचलित पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय आष्टी येथे गेली १६ वर्षापासून शिक्षक म्हणून न्यायदानाचे पवित्र कार्य करीत आहेत. मागिल ३२ वर्षांमध्ये हजारो विद्यार्थी घडविले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत दि. १ जानेवारी रोजी विविध मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार भिमरावजी धोंडे, युवा नेते अजय दादा धोंडे, अभय राजे धोंडे, प्रशासन अधिकारी डॉ.डी बी राऊत, डॉ.शिवदास विधाते,माऊली बोडखे, संजय शेंडे,संदीप नन्नवरे, सागर वाघुले, पंडित शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य सुरेश बोडखे, माजी सरपंच विठ्ठल राख, हाजीपुर समस्त ग्रामस्थ राजकीय,सामाजिक,शैक्षणिक, पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर व पंडित शाळेचे सर्व सहकारी शिक्षक शिक्षिका शाळेचे विद्यार्थी यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### श्रीक्षेत्र बेलेश्वर...

तुकाराम महाराज भारती यांच्या शुभहस्ते आज दि. २२ (सोमवार) रोजी बेलेश्वर मंदिरात करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही भक्तांच्या मागणीनुसार प्रकाशित करण्यात आलेली ही सन २०२६ ची दिनदर्शिका आकर्षक व दर्जेदार स्वरूपात तयार करण्यात आली असून, यात श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानातील पवित्र स्थळांची छायाचित्रे, ईश्वरभारती बाबांचे प्रेरणादायी विचार, तसेच धार्मिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक माहितीचा समावेश करण्यात आला आहे. या दिनदर्शिकेत सण-उत्सव, तिथी, धार्मिक कार्यक्रमांची माहिती, स्थानिक विकासकामांचा आढावा व सामाजिक उपक्रमांचा उल्लेख करण्यात आला असून, ही दैनंदिनी भक्तांसाठी उपयुक्त ठरणार आहे. या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) , विक्रम दाभाडे, पांडुरंग वाणी,दिलीप शेळके यांच्यासह संस्थानचे पदाधिकारी, भाविक भक्त व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सहकार आयुक्त...

◆ पान ४ वरून पुढे...

राज्याचे सहकार मंत्री मा. श्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते पार पडले. तर हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त मा. दीपक तावरे (ख-ड) तसेच कॉसमॉस बँकचे बोर्ड ऑफ मॅनेजमेंट अध्यक्ष मा. सी. ए. मिलिंद काळे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक मा. ॲड. रविंद्र कानडे, मुख्य सरव्यवस्थापक श्री भिसे तसेच,एच. आर. विभाग प्रमुख श्री राहुल काटकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. श्री मंगलनाथ मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीने गेल्या अनेक वर्षांपासून समाजाच्या आर्थिक सबलीकरणासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करत, पर्यावरणपूरक उपक्रम राबवून व सामाजिक बांधिलकी जपत सहकार चळवळीचा आदर्श निर्माण केला आहे. संस्थेच्या या सर्वांगीण, लोकाभिमुख व मूल्याधिष्ठित कार्याची दखल घेत 'ग्रीन वर्ल्ड २०२५' पुरस्काराद्वारे राज्य व राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला आहे. हा पुरस्कार म्हणजे संस्थेवरील सभासदांचा अतूट विश्वास तसेच अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या अथक परिश्रमांचे फलित असल्याचे नमूद करण्यात आले. यापुढेही संस्था सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय जबाबदारीची ही परंपरा अधिक बळकट करत सहकार क्षेत्रात आदर्श निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त करत संस्थेचे संस्थापक माननीय आर. जी. कानडे साहेबांनी हा पुरस्कार सर्व सभासदांना समर्पित केला.

### निगरगट्ट प्रशासनाने...

विहीर, गायगोठा व घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावेत,अशी मागणीही उपोषणातून करण्यात आली आहे.यासोबतच चिंचोली माळी ग्रामपंचायत हद्दीतील नामदेव महाराज परिसरातील अतिक्रमण हटविणे,येथील कर्मवीर विद्यालयाच्या २००५ ते २०२५ या कालावधीतील निवेदनांवरील मागण्यांची चौकशी करून कार्यवाही करणे,प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जुन्या व नव्या इमारतींच्या बांधकाम व पुनर्विकासासाठी २०१५ ते २०२५ या कालावधीत प्राप्त व खर्च झालेल्या निधीची माहिती देऊन चौकशी करणे, महाडीबीटी अनुदानाचे प्रलंबित लाभ शेतकऱ्यांना तात्काळ देणे,गायरान परिसरातील सौरऊर्जा प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करणे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. दि.११ डिसेंबर २०२५ रोजी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे सादर केलेल्या सर्व मागण्या मान्य करण्यात याव्यात, तसेच चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम तातडीने सुरू करण्यात यावे,या मागण्यांसाठीच हे आमरण उपोषण सुरू करण्यात आल्याचे रोहन गलांडे यांनी सांगितले आहे.मागण्या मान्य होई पर्यंत उपोषण सुरूच राहील,असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# आरूष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेसचे रिजनल स्पर्धेत नेत्रदीपक यश;विद्यार्थ्यांवर अभिनंदनचा वर्षाव

### ४८ पैकी ३६ विद्यार्थ्यांची नॅशनल कॉम्पिटिशनसाठी निवड ;पुणे येथे होणार नॅशनल कॉम्पिटिशन

**विद्यार्थ्यांच्या यशामागे सातत्यपूर्ण मार्गदर्शन,शिस्तबद्ध सराव,आधुनिक शिक्षणतंत्र आणि पालकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे : प्रा.अविनाश जगताप**

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

किल्ले धारूर शहरातील शैक्षणिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवून नावलौकिक वाढवत विद्यार्थ्यांच्या अंगी गणिताची गोडी वाढवणाऱ्या आरूष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी दिनांक २० डिसेंबर रोजी बीड येथे झालेल्या प्रोऍक्टिव्ह अबॅकस च्या रिजनल लेव्हल कॉम्पिटिशनमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत क्लासेस च्या यशाच्या परंपरेत आणखी एक सुवर्णपान जोडले आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या घवघवीत यशामुळे संपूर्ण धारूर शहरात



गौरवाची आणि अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.

दि.२० डिसेंबर रोजी बीड येथे प्रोऍक्टिव्ह अबॅकस च्या वतीने आयोजित करण्यात आलेली रिजनल लेव्हल अबॅकस स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत परभणी ,धाराशिव, अहिल्यानगर, लातूर व बीड जिल्ह्यातील जवळपास १००० विद्यार्थी सहभागी झाले होते त्यापैकी किल्ले धारूर येथील आरूष प्रोक्टिव्ह अबॅकस क्लासेसचे एकूण ४८ विद्यार्थी सहभागी झाले होते.विशेष म्हणजे या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्ता, वेगवान गणनाशक्ती आणि अचूकतेच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी करत परीक्षकांचे व उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या स्पर्धेतून तब्बल ३६ विद्यार्थ्यांची निवड पुणे येथे होणाऱ्या नॅशनल लेव्हल कॉम्पिटिशनसाठी करण्यात आली आहे. हा आकडा केवळ यशाचे प्रमाण दर्शवत नाही, तर आरुष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लास हा दर्जेदार शिक्षणपद्धतीचे आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शनाचे मूर्त उदाहरण आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालकवर्गात समाधानाचे वातावरण असून,आपल्या पाल्यांच्या उज्ज्वल भवितव्याबाबत विश्वास अधिक दृढ झाला आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

व विद्यार्थ्यांना आगामी नॅशनल लेव्हल कॉम्पिटिशनसाठी प्रोऍक्टिव्ह अबॅकस कोल्हापूरचे सर्वेसर्वा अजय मणियार सर,गिरीश करडे सर व आरूष प्रोक्टिव्ह अबॅकस क्लासेस,किल्ले धारूरचे संचालक प्रा.अविनाश जगताप सर आणि संचालिका शीतल जगताप मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.विद्यार्थ्यांच्या यशामागे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, शिस्तबद्ध सराव, आधुनिक शिक्षणतंत्र आणि पालकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचेही प्रा.अविनाश जगताप यांनी सांगितले.

#### ● विद्यार्थ्यांवर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव...

**आरूष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेसच्या अभूतपूर्व यशाबद्दल पालक, ग्रामस्थ,शिक्षकवर्ग तसेच शिक्षणप्रेमी नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या यशामुळे किल्ले धारूरचे नाव जिल्हा व राज्य पातळीवर उज्ज्वल झाले असून,भविष्यातही येथील विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करतील,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.**

#### ● प्रगतीचा आलेख पाहता आरूष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासला मिळाला बेस्ट सेंटर अवार्ड

**गेल्या २ वर्षांपासून धारूर शहरात शैक्षणिक क्षेत्रात चालत असलेल्या आरूष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेस च्या प्रगतीचा आलेख पाहता प्रोऍक्टिव्ह अबॅकस ने आरूष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेस किल्ले धारूर ला बेस्ट सेंटर अवॉर्ड देऊन सन्मानित केले आहे .**

## शरदचंद्र विद्या मंदिर बीड येथे १४७ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**बीड । प्रतिनिधी**

घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाणदिनी महामानवाभिवादन ग्रुपला मिळालेल्या दानातून १४७ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) शरदचंद्र विद्या मंदिर बीड येथे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. छत्रपती शाहू महाराज,संत गाडगेबाबा, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्प माला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. प्रमोद गायकवाड सर,प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक समर्थ राजयोग चे संपादक मा. वैभव स्वामी एस एस सोनवणे व महामानव



अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले लाभले होते. ऍड.तेजस वडमारे, डी.एम राऊतव के.एस वाघमारे यांची विचार मंचावर प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन इयत्ता ६ वी तील विद्यार्थिनी कुमारी अंजली समाधान ससाने हिने केले. प्रास्ताविक वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी.जी वानखेडे यांनी करून महामानवाभिवादन ग्रुप राबवीत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. ६ व्या वर्गातील विद्यार्थिनी कुमारी तेजश्री दिनकर मस्के हिने आपल्या सुस्पष्ट व खणखणीत आवाजात महापुरुषांच्या जीवन कार्याबद्दल सांगितले की,आरक्षणाचे जनक व प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारे रयतेचे राजे छत्रपती शाहू महाराज, वंचितांसाठी शिक्षणाची दारे खुले करणारे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले, अंधश्रद्धा,नशा-पाणी,

कर्जबाजारीपणा पासून दूर रहा सार्वजनिक स्वच्छता व मनाची स्वच्छता याचे महत्व आपल्या अनमोल व सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत,कीर्तनातून बहुमोल उपदेश करणारे संत गाडगेबाबा व शिक्षणाशिवाय माणसाची प्रगती होणार नाही तरी उच्च शिक्षण घेऊन त्या ज्ञानाचा उपयोग संपूर्ण देशाकरता करणारे, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांच्या कार्याबद्दल व उपदेशांचे वाचन करून तसे जीवन जगून प्रगतीच्या मार्गावर आपल्या सर्वांनी वाटचाल करीत राहावे असे सांगितले तिचे या ओघवत्या व माहितीपूर्ण भाषणाबद्दल सर्वांनी टाळ्याच्या गजरात तिचे कौतुक करून छत्रपती शाहू महाराजांचे जीवन चरित्र पुस्तक;वही पेन व पुष्पगुच्छ देऊन वाचाल तर वाचाल व महामानव अभिवादन ग्रुप तर्फे मान्यवरांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

## निरोगी भविष्यासाठी प्रत्येकाने निर्व्यसनी बनून आरोग्य जोपासावे : जलनायक मयंक गांधी

### कृषीकुल येथे मोफत आरोग्य तपासणी ; शेकडोंचा उत्स्फूर्त सहभाग

**सिरसाळा । प्रतिनिधी**

धकाधकीचे जीवनमान आणि वाढते पर्यावरणीय प्रदूषण यामुळे आरोग्याच्या गंभीर समस्या वाढत असल्याची चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. परळी शहरासह परिसरातील अनेक गावांमध्ये हवेचे प्रदूषण धोकादायक पातळीवर पोहोचले असून, याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. मोठ्या प्रमाणावर कुष्ठरोगाचे रुग्ण आढळत असून श्वसनाचे गंभीर आजार वाढत असल्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे मत ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी व्यक्त केले.



सिरसाळा येथील कृषीकुल येथे ग्लोबल विकास ट्रस्ट आणि उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात ते उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. सामाजिक कार्यात सक्रिय असणाऱ्या प्रत्येकाने स्वतःच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे समुपदेशक शरद चव्हाण यांनीही उपस्थितांना आरोग्याचे महत्त्व समजावून सांगितले.

सोमवार, दि. २२ डिसेंबर रोजी आयोजित या शिबिरात एकूण १२५ पेक्षा जास्त जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीचे पूर्ण अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात येणार असून, ज्यांना आरोग्याची समस्या दिसून येईल त्या सर्व कर्मचाऱ्यांना योग्य वैद्यकीय सल्ला देऊन उपचारासाठी मदत करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले. उद्घाटनप्रसंगी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांची प्रमुख उपस्थिती होती. सुखी आणि निरोगी भविष्य घडवण्यासाठी प्रत्येकाने स्वतःचे आरोग्य जपले पाहिजे, व्यसनांपासून दूर राहून नियमित व्यायाम व प्राणायाम करण्याचा सल्ला त्यांनी दिला.



*राष्ट्रसंत गाडगे महाराज यांना अभिवादन करतांना. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष. तथा माजी नगरपरिषद सभापतीबीड. श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील, अशोक ची लोढा, माजी नगरसेवक बाबुरावजी परळकर, दत्तात्रय देवा नलावडे, महेंद्र वाघमारे, महेश जाधव*

## ४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कवी फ. म. शहाजिंदे यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**



छत्रपती संभाजीनगर येथे आज मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीची बैठक झाली. याबैठकीत जेष्ठ कवी फ. म. शहाजिंदे यांची शांतीवन ता. शिरुर कासार, जि.बीड येथे होणाया ४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. ४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनासाठी शांतीवनचे संस्थापक श्री. दिपक नागरगोजे यांना निमंत्रन होते. त्यांच्या शांतीवन प्रकल्प आर्वी ता. शिरुर कासार, या सेवाभावी सस्स्थेत एप्रिल महिन्यात होईल.

फ.म. शहाजिंदे यांची निधर्मी, आदम, ग्वाही, झोंबणी, शेतकरी इत्यादी कवितासंग्रह, मी तू ही कादंबरी तर सारांश, इत्यर्थ, शब्दबिंब इत्यादी समीक्षाग्रथ, वाकळ, प्रत्यय, अनुभव हे लेखसंग्रह, मराठवाडयातील कविता, पुरचुंडी, मुठभर माती, आशय व अन्वयार्थ, मुस्लिम मराठी साहित्य : प्रेरणा आणि स्वरुप ही संपादने प्रसिध्द आहेत.

यापुर्वी ते पाचवे मराठवाडा युवक साहित्य संमेलन, वाकुळणी, जि. जालना, पहिले मुस्लिम मराठी साहित्य संमेलन, निलंगा जि. लातुर, पाचवे पुरोगामी मराठी साहित्य संमेलन, कंधार जि. नांदेड, तिसरे शेकोटी साहित्य संमेलन, धारगळ गोवा इत्यादी साहित्य संमेलनाची अध्यक्षपदे त्यांनी भुसविलेली आहेत. आपल्या लेखनासाठी त्यांना विविध साहित्य संस्थाचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यात कवी केशवसुत काव्य पुरस्कार, यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीचा अंबाजोगाई साहित्य पुरस्कार, हमीद दलवाई साहित्य पुरस्कार (मुंबई), मारुती मगर साहित्य सेवा पुरस्कार(लातुर), तुका म्हणे साहित्य पुरस्कार, (बुलढाणा), शिक्षक रत्न पुरस्कार(मुंबई), सुशीलकुमार शिंदे साहित्य गौरव पुरस्कार (सोलापुर) इत्यादींचा समावेश आहे.

## सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड येथे राष्ट्रीय गणित दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय गणित दिनानिमित्त सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड येथे गणित विभागामार्फत विविध शैक्षणिक व प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भारताचे महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

हा कार्यक्रम नवगण शिक्षण संस्थेचे सचिव मा. डॉ. योगेश क्षीरसागर, सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर व डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या प्रेरणेतून तसेच संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विश्वंभर देशमाने व डॉ. सुधाकर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

या निमित्ताने फॉर्म्युला रायटिंग स्पर्धा ,थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवन व कार्यावर आधारित भित्तिपत्रकाचे प्रकाशन, तसेच गणित विषयाचे विविध क्षेत्रांतील महत्त्व या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी भूषविले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी गणित विषयाचे शैक्षणिक व व्यावहारिक महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी गणिताकडे केवळ अभ्यासाचा विषय म्हणून न पाहता तर्कशक्ती, अचूकता व समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणारे शास्त्र म्हणून पाहावे, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून रसायनशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. सोनाजी गायकवाड यांनी गणित विषयाचे विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, संशोधन तसेच दैनंदिन जीवनातील विविध क्षेत्रांतील महत्त्व सविस्तरपणे स्पष्ट केले. त्यांच्या अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी व्याख्यानाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## वडवणीत शाकंभरी पौर्णिमेनिमित्त ज्ञानेश्वरी पारायण व शिव महापुराण कथा, अखंड हरिनाम सप्ताह चे आयोजन

**वडवणी । प्रतिनिधी**





वडवणी शहरामध्ये शाकंभरी पौष पौर्णिमेनिमित्त श्री. श्री. श्री. दयानंद पुरी महास्वामीजी यांच्या आशिर्वादाने ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके यांच्या प्रेरणेतून व ह. भ. प. प्रेममूर्ती नामदेव महाराज लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी शहरात प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आणि भव्य कीर्तन महोत्सव तथा अखंड हरिनाम सप्ताह व भव्य शिव महापुरण कथा ह.भ.प.श्री . नामदेव महाराज लबडे यांच्या मधूर वाणीतून संपन्न होणार आहे.याचा आरंभ शनिवार दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी ठिकाण - राम मंदिर चौक येथे संपन्न होणार असून याची सांगता शाकंभरी पौष पौर्णिमा दिनी शनिवार दिनांक ०३ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. यादरम्यान विविध धार्मिक, अध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांची मोठी भक्तीची प्रविणी राहणार असून तरी या अध्यात्मिक पर्वणीचा पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त कोष्टी समाज बांधव व ग्रामस्थ वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये व किर्तन महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहेत. या उत्सवासाठी गेल्या महिनाभरापासून जय्यत तयारी करण्यात येत आहे. हा महोत्सव दि. २७ डिसेंबर २०२५ ते ०३ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ६ ते ७ विष्णूसहस्त्रनामपाठ, ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ गाथा भजन, रोज दुपारी २ ते ५ भव्य शिव महापुराण कथा ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकीर्तन व नंतर हरिजागर होईल. दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते १० चौंडेश्वरी मातेची भव्य मिरवणूक निघेल. या सप्ताहामध्ये ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व ह.भ.प. धिरज महाराज यादव यांचे आहे तर गाथा भजन व काकडा नेतृत्व आणि साथ ह.भ.प. दामू अण्णा गोंडे व समस्त भजनी मंडळी व हरिपाठ नेतृत्व व साथ ह.भ.प.सखाराम महाराज बानेगांवकर यांचे आहे. तर मृदंगाचार्य ह.भ.प. तालमणी वैभव महाराज सावळे, ज्ञानेश्वर महाराज लोकरे, बंडू महाराज सातपुते,तर गायनाचार्य अनिरुद्ध महाराज नालेगांवकर, माऊली महाराज घुमरे, माऊली महाराज धारासुरकर, अनिरुद्ध महाराज कारकर, चक्रधर महाराज शिंदे,बप्पा महाराज कोठुळे, बालाजी महाराज सरकटे, पुरुषोत्तम महाराज कोठुळे, विष्णुपंत महाराज निपटे, तात्यासाहेब महाराज मस्के, हरिभाऊ महाराज जाधव, गोपीनाथ महाराज मस्के हे असतील. हा सप्ताह श्री. श्री. श्री. दयानंद पुरी महास्वामीजी व ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके यांच्या आशीर्वादाने मार्गदर्शक भागवताचार्य ह.भ.प.सुधाकर महाराज चिनके यांच्या प्रेरणेने होत आहे. या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये दररोज दुपारी २ ते ५ शिव महापुरण कथा ह.भ.प.नामदेव महाराज लबडे यांच्या मधूर वाणीतून संपन्न होईल.

या दरम्यान हरी किर्तन दररोज दि.२७ रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकेकर, दि.२८ रोजी ह.भ.प. कृष्णा महाराज चवरे, दि.२९ रोजी ह.भ.प. दयानंद महाराज कोरेगावकर ,दि. ३० रोजी ह.भ.प.यशोधन महाराज साखरे, दि. ३१ रोजी ह.भ.प. राजेश महाराज गुंजर्गेकर , दि. १ रोजी ह.भ.प. उमेश महाराज किर्दत, दि. २ रोजी ह. भ. प. उमेश महाराज दशरथे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. तर शनिवार दि. ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते १० दरम्यान चौंडेश्वरी मातेची भव्य पाळखी मिरवणूक निघेल.व सकाळी १० ते १२ या वेळेत प्रेममूर्ती ह.भ.प.नामदेव महाराज लबडे यांचे काल्याचे किर्तन व त्यानंतर सार्वजनिक महाप्रसादाची पंगत होणार आहे. तरी या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये सर्व भाविक भक्तांनी सहभागी होण्याचे आवाहन समस्त कोष्टी समाज बांधव व ग्रामस्थ वडवणीच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक मराठवाडा पत्र दि. २३/१२/२०२५

**टी.सी. हरवला आहे.**

**विश्वनाथ संदिपान लांडे या नावाचा दहावी पास चा टीसी बीड ते नाथापूर प्रवास दरम्यान हरवला आहे. कोणाला आढळून आल्यास संपर्क करावा. संपर्क मो.९८२२९८९१९९**

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात

### पत्रकार नागनाथ वारद यांचे निधन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

गेली अनेक वर्षांपासून विविध दैनिकात काम करणारे पत्रकार नागनाथ वारद यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. शालेय जीवनापासून नागनाथ वारद हे आपल्या मित्र परिवारात एक ॲक्टीव्ह पर्सन म्हणून ओळखले जायचे. महाविद्यालयीन शिक्षणानंतर नागनाथ वारद सामाजिक कार्यासोबतच पत्रकारितेचे वळले. गेली अनेक वर्षे त्यांनी विविध जिल्हा व विभागीय दैनिकात अंबाजोगाई तालुका प्रतिनिधी म्हणून काम केले. गेली अनेक महिन्यांपासून नागनाथ वारद हे विविध व्याधिंनी त्रस्त झाले होते. दिवसेंदिवस त्यांची प्रकृती क्षीण होत होती. अखेर २१ डिसेंबर रोजी रात्री त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दिनांक २२ डिसेंबर रोजी नागनाथ वारद यांचे पार्थिवावर बाराखांबी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आप्तेष्ट, मित्रपरिवार व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. दैनिक मराठवाडा पत्र परिवार त्यांच्या दु:खात सहभागी आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या युवक सरचिटणीस पदी दादासाहेब जगताप यांची निवड

आष्टी । प्रतिनिधी



गावाचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने अगदी कमी वयात राजकारणात झोकून देऊन गावच्या सरपंच पदाची धुरा यशस्वीपणे सांभाळणारा तरुण उमदा चेहरा तालुक्यातील कोहिणी पाटण ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच दादासाहेब जगताप यांची राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हा सरचिटणीस पदी निवड करण्यात आली आहे. ▶▶ उर्वरित पान २

# बीड जिल्ह्याच्या विकासासाठी अधिकाऱ्यांनी स्वयंप्रेरणेने काम करावे

## अपारंपारिक ऊर्जा संचालक सुमन चंद्रा




बीड । प्रतिनिधी

आकांक्षित तालुका अंतर्गत वडवणी मधील प्रगती चांगले आहे. यापुढील काळातही यापेक्षा अधिक गतीने काम करून विशेषत्वाने महिलांचे जीवनमान उंचवावे जेणेकरून येथील बालविवाहाचे प्रमाण कमी होऊ शकते. कोणी येऊन काम करेल याची वाट न बघता सर्व अधिकाऱ्यांनी हे आपलेच काम समजून स्वयं प्रेरणेने काम करण्याची गरज आहे. हो सर्वांनी करावे असे आवाहन नवीन आणि नवीनिकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या संचालक सुमन चंद्रा यांनी आज येथे केले.

आकांक्षित तालुका विकास कामाचा आढावा आज एका बैठकीत घेण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान तसेच अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, जिल्हा नियोजन अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थित होती. देशात ५०० ब्लॉक मधील तालुक्यामध्ये हा आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत मागासलेल्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट केंद्र शासनाने ठेवलेले आहे. यामध्ये वडवणी तालुका देशात ११७ व्या क्रमांकावर असून चार झोन अंतर्गत ६९ ब्लॉक मध्ये बारावा आणि राज्यात वडवणी तालुका कामाच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर आहे. या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी, सामाजिक विकास आणि पायाभूत सुविधा या सात मुद्द्यावर आधारित उद्दिष्टे ठरवून विकास करावयाचा आहे. बीडमध्ये बदल घडत आहे याचा संदेश दिला गेला पाहिजे. या ठिकाणी असणाऱ्या बालविवाह समस्येचे मूळ विविध कारणांमध्ये आहे. त्यामुळे मुलींचे शिक्षण त्यांचे समाजातील स्थान आणि त्यांच्या कार्याचे मोल या मुद्द्यांवर लक्ष दिले गेले पाहिजे असे सुमन चंद्रा यावेळी म्हणाल्या. समस्येचा शोध घेतला आहे त्याची योग्य कारणमीमांसा व त्यावर सकारात्मकपणे उपाय योजना ▶ उर्वरित पान २ वर

## चिंचाळा ते देसूर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे डांबराचे प्रमाण अत्यल्प; खडी पडली उघडी वाहन चालकांची कसरत

आष्टी । प्रतिनिधी

चिंचाळा ते देसूर या रस्त्यावर डांबराचे प्रमाण अत्यल्प असल्याने या रस्त्यावरील खडी उघडी पडली आहे. या मार्गे मोठ्या प्रमाणात वाहतुक चालु असते. त्यामुळे वाहनचालकांना आपली वाहाने चालवताना शारिरीक त्रासाला समोरे जावे लागत आहे.

या रस्त्यावरील खड्डे पडण्यास सुरूवात झाली आहे. यासह मार्गावर अवघड वळणे आहेत. यावर केलेला खर्च वाया जात असल्याचे जनतेतून बोलले जात आहे. शेकापूर मार्गे बीडसांगवी कडे जाण्याचा मार्ग अत्यंत खराब



झाल्याने लोक चिचाळा मार्गे बीड सांगवीला जाण्यास पसंती देत आहेत. परंतु यामार्गाचीही दुरवस्था झाली आहे. सदरील काम करताना यामध्ये डांबर अत्यल्प प्रमाणात वापरल्यामुळे जागोजागी रस्ता उखडला आहे . किन्ही मार्गे बीडसांगवी कडे जाण्याच्या मार्गाची परिस्थीती काही वेगळी नाही. त्यामुळे तीनही बाजुने लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही रस्ते पुर्ण होई पर्यंत मागे उखडत आहेत ? असीच काहीशी ▶▶ उर्वरित पान २ वर

## पोखरी (घाट) शेतकरीपुत्रांचे भाववाढीच्या 'शेतकरी हक्क मोर्चा'त सहभागी होण्याचे आवाहन : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील पोखरी (घाट) येथील शेतकरी पुत्रांनी कापूस, सोयाबीन, तूर आदी शेतमालाला वाढीव दर मिळावा, सीसीआय व जिनिंग केंद्रांवरील शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवावी तसेच हमीभावापेक्षा कमी दराने शेतीमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागण्यांसाठी होणाऱ्या 'शेतकरी हक्क मोर्चा'त मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. दि. २५ डिसेंबर (गुरुवार)



रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे काढण्यात येणाऱ्या धडक 'शेतकरी हक्क मोर्चा'चे आयोजन शेतकरी पुत्रांनी केले असून, या मोर्चामार्फत राज्य सरकारने कापसाला १२ हजार, सोयाबीनला ७ हजार व तुरीला १२ हजार रुपये प्रतिक्विंटल दर जाहीर करावा, अशी ठाम मागणी करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आज दि. २२ (सोमवार) रोजी पोखरी (घाट) येथील मुख्य चौकात शेतकरी पुत्र डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या पुढाकाराने शेतकरी जनजागृती बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस सरपंच बिभीषण मुळीक, आण्णासाहेब खिल्लारे, नितीन दळवे, सर्जेराव बाबर, सुंदर खिल्लारे, सुनील सांगळे, दत्ता भिसे, दामोदर हिंदोळे, चांगदेव मुळीक, हनुमंत कणसे, अशोक खिल्लारे, सोमिनाथ ▶▶ उर्वरित पान २ वर

## ज्यांनी सांभाळ केला, त्यांनीच सुपारी देऊन संपवलं! बीडच्या जवळगाव खून प्रकरणाचा उलगडा



अंबाजोगाई । प्रतिनिधी

जवळगाव (ता. अंबाजोगाई) शिवारात आढळलेल्या अनोळखी प्रेताचे गूढ उकलण्यात बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेला अवघ्या ४८ तासांत यश आले आहे. कौटुंबिक वादातून आणि मयताच्या त्रासाला कंटाळून त्याच्याच वडिलांच्या सख्ख्या साडूने भाडोत्री मारेकऱ्यांच्या मदतीने हा खून केल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी मुख्य आरोपीसह चार जणांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. १८ डिसेंबर २०२५ रोजी बर्दापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील जवळगाव शिवारात एका अज्ञात पुरुषाचा मृतदेह पालथ्या अवस्थेत आढळून आला होता. शवविच्छेदन अहवालात या व्यक्तीचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे समोर आले. त्यानंतर अज्ञात ▶ उर्वरित पान २ वर

## कळंब - लातूर महामार्गावर ऊसतोड मजुरांना उडविले; 7 जखमी, 4 जणांची प्रकृती गंभीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कळंब-लातूर महामार्गावर 'हिट अँड रन' प्रकार घडला. भरधाव वेगात आलेल्या एका अज्ञात वाहनाने रस्त्यावरून चालणाऱ्या ७ ऊसतोड मजुरांना उडवले. या भीषण अपघातात ४ मजुरांची प्रकृती चिंताजनक असून त्यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे. अपघातात जखमी झालेले सर्व मजूर कळंब तालुक्यातील मंगरूळ गावचे रहिवासी असून ते आदिवासी पारधी समाजातील आहेत. दिवसभर ऊस तोडीचे कष्ट उपसून हे मजूर आठवडी बाजारासाठी कळंबकडे येत असतानाच काळाने त्यांच्यावर घाला घातला. कळंब-लातूर रस्त्यावरून आलेल्या एका भरधाव वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेचा वेग इतका प्रचंड होता की, मजूर रस्त्यावर दूरवर फेकले गेले. मात्र, माणुसकी विसरलेला चालक मदतीला थांबण्याऐवजी वाहनासह पसार झाला. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. जखमींना तातडीने कळंब उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान चौघांची प्रकृती अत्यवस्थ झाल्याने त्यांना बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. लातूर पासिंगच्या वाहनाचा संशयअपघातग्रस्त वाहनावर लातूर जिल्ह्याचे पासिंग असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून चालक लातूर जिल्ह्यातीलच असावा, असा संशय व्यक्त होत आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच ▶ उर्वरित पान २ वर




## राज्यस्तरीय गंगाई बाबाजी आदर्श शिक्षक पुरस्काराने पंडीत नेहरू विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक कल्याण वाल्हेकर सर होणार सन्मानित

आष्टी । प्रतिनिधी



हाजीपुर सारख्या ग्रामीण भागातून हलाकीच्या परिस्थितीवर मात करत शिक्षण घेऊन १९९४ साली शिक्षक म्हणून कार्य सुरू केले. शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातील ही मुले घडली पाहिजेत. चांगले संस्कार देखील देऊन हजारो विद्यार्थी घडविण्यासाठी मागिल ३२ वर्षापासून ज्ञानार्जनाचे पवित्र कार्य करणारे आदर्श शिक्षक कल्याण वाल्हेकर सर यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यबद्दल अनेक पुरस्कार प्राप्त आहेत.त्यांच्या कार्याची दखल घेत शिक्षण महर्षी मा. आ. भीमराव धोंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या राज्यस्तरीय गंगाई बाबाजी आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. ▶ उर्वरित पान २ वर

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन

### मठाधिपती महादेव महाराज भारती व शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या हस्ते प्रकाशन

लिंबागणेश । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान, बेलगाव ता. जि. बीड यांच्या वतीने सन २०२६ या वर्षासाठी प्रकाशित करण्यात आलेल्या 'श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान दैनंदिनी व दिनदर्शिकेचे' प्रकाशन संस्थानचे मठाधिपती महंत महादेव महाराज भारती व शांतीब्रम्ह ▶ उर्वरित पान २ वर



## सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या हस्ते झाला श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा गौरव

माजलगाव । प्रतिनिधी

सहकार क्षेत्रात गेल्या २५ वर्षांपासून उल्लेखनीय, सातत्यपूर्ण व समाजाभिमुख कार्य करणाऱ्या श्री मंगलनाथ मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेला आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने कॉसमॉस बँक व ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन यांच्या वतीने 'ग्रीन वर्ल्ड २०२५' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने पुणे येथे आयोजित सहकार मंथन या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. या गौरवपूर्ण कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र ▶ उर्वरित पान २ वर



# निगरगट्ट प्रशासनाने रोहन गलांडेला जिवे मारायच ठरवले का ?




### बेमुदत आमरण उपोषणाचा पाचवा दिवस, प्रकृती चिंताजनक, प्रशासन,केज तहसीलदार गिड्डे जाग कधी येणार ?

केज । प्रतिनिधी

चिंचोली माळी ता.केज येथे विविध प्रलंबित नागरी व शासकीय मागण्यांच्या पूर्ततेसाठी रोहन गलांडे यांनी बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. बुधवार दि.१७ डिसेंबर रोजी सायंकाळी ७-३० वाजता संत नामदेव महाराज मंदिर येथे ते उपोषणास बसले आहेत.परंतु केज तहसीलदार राकेश गिड्डे, गटविकास अधिकारी नागरगोजे, माध्यमिक शिक्षण मंडळ अधिकारी प्रीयाराणी पाटील, सार्वजनिक बांधकाम विभाग घोळवे, कृषी अधिकारी पठाडे, पोलिस निरीक्षक स्वप्निल उनवने यांनी रोहन गलांडे पाटील यांना जिवे मारायच ठरवले आहे असे चिन्ह दिसत आहेत कारण अमरण उपोषणाचा चौथा दिवस आहे रोहन गलांडे पाटील यांची प्रकृती चिंताजनक झाली आहे त्यांना बोलताना छातीवर दाब येत आहे,डोके दुखी उम्मघाम होत आहे,छातीत दुखायला सुरुवात झाली आहे,अंग थरथरत आहे एवढ्या वेदना होतात परंतु प्रशासनाला काही घेणे देणे नाही परंतु रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे की मेलो तरी चालेल पण मागण्या मान्य झाल्या शिवाय अमरण उपोषण मागे घेणार नाही.या विषयी सविस्तर वृत्त असे की चिंचोली माळी येथील उर्वरित अतिक्रमण तात्काळ हटवून छत्रपती संभाजी महाराज चौक (नागबेट वस्ती) ते संत नामदेव महाराज मंदिरा पर्यंत रस्ता व नालीचे काम त्वरित सुरू करण्यात यावे,अशी प्रमुख मागणी त्यांनी केली आहे.तसेच केज तालुक्यातील ▶ उर्वरित पान २ वर